—: जाहिर निविदा :—

अहमदनगर येथील नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये सर्व मजल्यावरील महिला व पुरुष सार्वजनिक स्वच्छतागृहामधील प्रत्येक मोठया खिडकीजवळ १२ नवीन मोठे एक्झॉस्ट फॅन बसविणे आवश्यक आहे व तसेच मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे निजीकक्षामधील स्वच्छतागृहामध्ये १ नवीन गिझर बसविणे आवश्यक असल्यामुळे त्याबाबतची दरपत्रके अहमदनगर येथील स्थानिक बाजारपेठेतील अधिकृत विक्री करणा—यांकडून दरपत्रक मागविण्यात येत असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील

त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :—

१. आपल्या फर्मचा परवाना असणे आवश्यक आहे.

२ आपले फर्मचे नावाने पॅन व टॅन असणे आवश्यक आहे.

३. आपल्या फर्मचे नावाने जी एस टी. असणे आवश्यक आहे

४. आपल्या वस्तुंचे दरपत्रक सिलबद पाकीटात देणे आवश्यक आहे.

५. सिलबंद पाकीटावर दरपत्रक कशाचे आहे ते लिहिणे आवश्यक आहे

६ सिलबंद पाकीटावर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे नाव व पत्ता लिहिणे आवश्यक आहे.

७. सिलबंद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाद्वारे या कार्यालयाच्या आवक टेबलकडे आणून दयावेत.

८. दरपत्रकामध्ये यादीतील सर्व वस्तुचे दर लिहिणे आवश्यक आहे, अपूर्ण दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

९ सदरहु दरपत्रक दिनांक ०८/०८/२०२५ रोजी सायकाळी ०६—०० पर्यंत देणे आवश्यक आहे.

१० तत्पर व जलद सेवा देणा—या फर्मना प्राधान्य देण्यात येईल

११ दरपत्रकाबाबत दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर याचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१२. **कोणतेही कारण न देता दरपत्रके अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.**

१३. ज्यांचे दरपत्रक वरील अटीचे व शर्तीची पूर्तता करुन कमी दराचे असेल त्यांचेच दरपत्रक स्विकारण्यात येईल.

सदरचे दरपत्रक शुक्रवार दिनाक ०८/०८/२०२५ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि एस पी. चौक, अहमदनगर यांचे कार्यालयात आणून देणे आवश्यक आहे.

हुकूमावरुन,

जिल्हा न्यायालय, अहमदनगर
दिनाक — २८/०७/२०२५

अधिक्षक,
लेखा व वित्त विभाग,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

प्रत :—

१. **मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर,**
२. **मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर**
३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर
४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
५. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट